लोकमत ५.११.१

# खासगी संस्थांबरोबर फुकट कार्यक्रमांचा निर्णय अखेर रद्द

## मीरा-भाईंदर पालिकेचा निर्णय : दोन वर्षांनंतर प्रशासनाला जाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** महानगरपालिकेची जागा फुकट, वीज आणि पाणी फुकट शिवाय प्रसिद्धीसाठी जाहिरात फुकट करून घेत महापालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमांचे आयोजन करून स्वतःची प्रसिद्धी करून घेणाऱ्या संस्था आणि त्यांच्या चालकांना फायदा करून देण्याचा दोन वर्षांपूर्वी पालिकेने घेतलेला निर्णय अखेर रद्द करण्यात आला आहे. दोन वर्षांनंतर प्रशासनाला याबाबत जाग आली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेमध्ये २१ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रशासकीय ठराव केला गेला होता. या ठरावान्वये खासगी संस्थांना कार्यक्रम सादर करण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक मूलभूत सुविधा पुरवण्याचे ठरले होते.



जनतेला कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमातून त्याबद्दलची माहिती मिळण्यासाठी तसेच अशा कार्यक्रमांमुळे शहराचा विकास, वैभव व लौकिकात भर पडण्यासाठी आयोजक खासगी आणि सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने संयुक्तरीत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

१ गेल्या दोन वर्षांत मीरा-भाईंदर शहरात खासगी आणि सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या मैदान-सभागृहात अनेक कार्यक्रम घेण्यात आले. यासाठी अनेक दिवसांचे मैदान-सभागृहांचे भाडे महापालिकेने घेतले नाही. जागा मोफत उपलब्ध करून देतानाच त्यासाठीची वीज, पाणी, कचरा उचलणे, आदी व्यवस्थाही महापालिकेने मोफत पुरवली.

२ इतकेच काय तर त्या कार्यक्रमाच्या जाहिरातीसुद्धा पालिकेमार्फत मोफत केल्या गेल्या; परंतु अशा कार्यक्रमांतून मोफत चोचले पुरविल्याने पालिकेचे लाखोंचे नुकसान झाले आहे. कार्यक्रमाच्या जाहिरातीत कुठेतरी छोटेसे नाव आणि लोगो टाकला जायचा.

३ बाकी त्यातून प्रसिद्धी व आर्थिक फायदा आयोजकांचा होत असे. मैदानातील कार्यक्रमामुळे काही लाख रुपये खर्चून लावलेले गवत नष्ट होऊन जायचे. ते गवत लावण्यासाठी पुन्हा लाखांचा खर्च आणि वेळ जायचा. आता लाखो रुपयांचा भुर्दंड झाल्यावर अशा कार्यक्रमातून पालिकेला आणि शहरातील रहिवाशांना काही फायदा होत नाही.

४ उलट महापालिकेला तोटा सहन करावा लागतो व नुकसान होत असल्याची जाणीव आयुक्त संजय काटकर यांना झाली. त्या अनुषंगाने १४ ऑक्टोबरलाच्या बैठकीत आयुक्तांनी प्रशासकीय ठराव करीत आधीचा निर्णय रद्द केला आहे.

# नालासोपाऱ्यात लाखोंची घरफोडी

**नालासोपारा :** श्रीप्रस्था रोडवरील बिल्डिंग नंबर ८३ मध्ये राहणाऱ्या नॅन्सी स्वारेस (वय ६४) या वृद्ध महिलेच्या घरी मे ते १३ ऑक्टोबरदरम्यान लाखोंची घरफोडी झाली आहे. त्यांच्या घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटात ठेवलेले सुमारे १ लाख ९८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी झाले आहेत. नालासोपारा पोलिसांनी बुधवारी फातिमा शेख (वय १९)वर गुन्हा दाखल करून अटक केली आहे. अधिक तपास सुरू आहे.

# वालीवमधून दुचाकी चोरीला

**नालासोपारा :** वाडा येथील पोस्ट केलटन मुक्काम गोराड येथे राहणाऱ्या अविनाश कामडी (२१) या तरुणाची १ लाख रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. १४ ऑक्टोबरला सकाळी वसईच्या नाईकपाडा येथील जी. एस. पॉलिप्लास्ट कंपनीजवळ दुचाकी पार्क केली होती. पार्क केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे. बुधवारी वालीव पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल




**नालासोपारा :** वसईच्या नवघर येथील आझाद नगरच्या दुकान नंबर ४ मध्ये मिलाप युनानी आयुर्वेदिक सेंटर नावाचे क्लिनिक उघडून इस्तेखार शेख (वय ३६) याने दवाखाना थाटला होता. बुधवारी सकाळी नवघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुनीता पटेल (वय ३५) या तेथे गेल्यावर तेथे आरोपी बोगस डॉक्टर आधुनिक औषधे व वैद्यकीय उपकरणे वापरून दवाखाना चालवताना दिसून आला. या प्रकरणी माणिकपूर पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात वैद्यकीय व्यवसाय अधिनियम कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.३

# स्वराज अभियानाचा विरारमध्ये निर्धार मेळावा



लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : स्वराज अभियानाचे अध्यक्ष धनंजय गावडे यांच्या अध्यक्षतेखाली विरार येथे निर्धार मेळावा उत्साहात पार पडला. चंदनसार येथील स्वराज अभियानाच्या या पहिल्याच निर्धार मेळाव्यात गावडे यांनी वसई-विरारमध्ये विकासकामे झाली नसल्याचा आरोप केला आहे.

ते म्हणाले की, वसईतील जिल्हा परिषदेच्या बहुतेक शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. काही शाळा सध्या एखाद्या मंदिरात किंवा कुणाच्या तरी घरात भरवल्या जात आहेत. यावेळी कार्याध्यक्ष प्रिन्स सिंह, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश वायदंडे, प्रवीण गायकवाड यांच्यासह विविध मान्यवरांनी मेळाव्यात मार्गदर्शन केले.

- गरिबांच्या मुलांनी शिकायचे कुठे? शिक्षणापासून गरिबांची मुले वंचित राहत आहेत. शाळांसाठी इमारती बांधून देण्याऐवजी जागा ताब्यात द्या, मगच बांधू अशी अट घालून सत्ताधाऱ्यांनी गरिबांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.
- यावेळी आयोजक विरार शहरप्रमुख नितेश पाटील व युवा आघाडी संघटक श्रेयश म्हात्रे हेही उपस्थित होते.

# मीरा रोडच्या सागर सावंत याला अमेरिकेत पुरस्कार

## अभियांत्रिकी क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी



सर्वोत्कृष्ट सेक्शन लीडर एक्सिलन्स हा पुरस्कार अमेरिका अध्यक्ष जिमी केव्हिनी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता.

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडमध्ये राहणारा व सध्या अमेरिकेत असलेला दत्तात्रय ऊर्फ सागर सावंत याला अमेरिकेतील इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ऑटोमेशन या संस्थेकडून अभियांत्रिक क्षेत्रात रोबोटिक्स व ऑटोमेशनमध्ये १५ वर्षे उत्कृष्ट टेक्निकल कामगिरीबद्दल अमेरिकेतील साउथ कॅलिरिनो येथे एक्सिलन्स इन टेक्निकल अँचिव्हमेंट म्हणून पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

सागर सावंत हा इंजिनिअरिंग क्षेत्रात कार्यरत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील गेल्या नऊ वर्षातला हा त्याचा चौथा पुरस्कार आहे.

- यापूर्वी २०१६ रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे अमेरिका अध्यक्ष जिमी केव्हिनी याच्या हस्ते सर्वोत्कृष्ट सल्लागार व मदतनीस म्हणून स्टुडण्ट मेंटॉर म्हणून पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर सन २०१८ मध्ये व्हॉलेंटियर लीडर म्हणून त्याला अमेरिका अध्यक्ष ब्रायन कद्रीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला होता.
- मीरा-भाईंदरमध्ये राहात असताना शिवसेनेच्या युवासेनेत पदाधिकारी असलेला सागर सावंत हा शैक्षणिक कार्यात सक्रिय होता. माजी खासदार राजन विचारे, आमदार प्रताप सरनाईक आदींनी सागर याचे कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner

सामना पान : क्र. ६

११ कोटी ९६ लाखांची फसवणूक

## रेमो डिसोझासह आठ जणांवर गुन्हा

भाईंदर, दि. १७ (सा.वा.) – बॉलीवूडमधील प्रसिद्ध कोरिओग्राफर, चित्रपट दिग्दर्शक व निर्माता रेमो डिसोझा यांच्यासह आठ जणांविरोधात मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. व्ही अनबिटेबल या डान्स ग्रुपची तब्बल ११ कोटी ९६ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी रेमो डिसोझा, लिझेल डिसोझा, ओमप्रकाश चौहान, रोहित जाधव, फेम प्रोडक्शन कंपनी, रमेश गुप्ता यांच्यासह एका पोलीस कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदरमधील व्ही अनबिटेबल या ग्रुपने २०१८ मध्ये डान्स प्लस रिॲलिटी शो सीजन-४ मध्ये भाग घेतला. या ग्रुपने २०१५ ते २०२३ पर्यंत अमेरिका, हाँगकाँग, दुबई असे देश-विदेशात तब्बल २५० हून अधिक रिॲलिटी व स्टेज शो केले. दरम्यान, त्यांनी जिंकलेल्या बक्षिसांचे तब्बल ११ कोटी ९६ लाख १० हजार रुपयांची रक्कम न देता तुटपुंजे पैसे देऊन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर भंडाफोड

याप्रकरणी कोणावरही कारवाई होत नसल्याने या ग्रुपने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने पोलिसांना चार आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्यानंतर गुन्हे शाखा वसई युनिटने तपास करून अहवाल सादर केला. त्यानंतर प्रकरणाचा भंडाफोड झाला.

### वृद्धाचा मृत्यू

नालासोपारा : रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना मुंबई-अहमदाबाद महामार्गावर घडली. पेल्हार गावातील वर्तक वसाहत येथे राहणारे रामू पुसेकर हे रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला आहे. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस फरार चालकाचा शोध घेत आहेत.

लोकसत्ता पृ. पान. ४

## ज्येष्ठांची फसवणूक करणारे गजाआड

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : ज्येष्ठ नागरिकांना बोलण्यात गुंतवून, हातचालाखीने त्यांच्याकडील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या चार जणांच्या आंतरराज्यीय टोळीला गुन्हे शाखा तीनच्या पथकाने पकडण्यात यश मिळवले आहे. या टोळीकडून पोलिसांनी दोन गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१२ ऑक्टोबर रोजी नालासोपारा येथे रहाणाऱ्या जेसी रॉड्रीक्स (५९) यांची दोन भामट्यांनी फसवणूक केली होती त्यांच्याजवळील ५ लाख रुपयांचे कागदी खोटे बंडल देऊन त्यांच्या गळ्यातील एक लाख रुपये किंमतीची दीड तोळे वजनाची सोन्याची चेन फसवणूक लंपास केली होती. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा ३ च्या पथकाकडून तपास सुरू होता. दरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करून तसेच बातमीवरुन आरोपी शंकर राय (३७), मंगल सिलावट (३७), सचिन राठोड (२२) आणि राजुराव राय (२५) यांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक तपास केल्यावर दोन गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपीकडून दोन्ही गुन्ह्यांतील फसवणूक झालेले सुमारे तीन लाख रुपये किंमतीचे दागिने व इतर मुद्देमाल हस्तगत केला आहे.

Scanned with OKEN Scanner

(पुण्यनगरी) पान. क्र. ८.

# कांदळवन झाडांच्या कत्तलप्रकरणी गुन्हा

## महापालिकेसह सोसायटी, टर्फमालकांकडून कायद्याचे उल्लंघन



**मीरारोड :** मीरा परिसरातील पेणकरपाडा येथील जागेवर शासनाने व मुंबई उच्च न्यायालयाने प्रतिबंधित केलेल्या कांदळवन झाडांची कत्तल करून तेथे बेकायदा बांधकामे करून लश क्रिकेट टर्फ, पत्र्याच्या झोपड्या, लग्नाचे मंडप, स्नूकर पार्लर, कंटेनर, महापालिका मलनिस्सारण विभाग यांनी पत्र्याची झोपडी, शौचालय व सोसायटीच्या इमारतीचे कंपाउंड भिंती बांधल्याने काशीमीरा पोलीस ठाण्यात पर्यावरण संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेणकरपाडा परिसरातील कांदळवन झाडांची कत्तल करून माती भराव करून बेकायदा बांधकामे केल्याने टर्फमालक, नवयुवान को. ऑप. हौ. सो.लि, शांतीनगर सेक्टर ८, अमन शांतीनगर, आकाशगंगा अपार्टमेंट, को. ऑप. हौ. सो.लि, आनंदछाया को. ऑप. हौ. सोसायटी.लि, २२ व २४, प्यारा मेडिकल इन्स्टिट्युट या इमारती, तसेच मीरा-भाईंदर महापालिका मलनिस्सारण विभाग यांनी पत्र्याची झोपडी असे मौजे. पेणकरपाडा येथील जागेत बेकायदा बांधकामे केल्याचे, तसेच पर्यावरणाचा ऱ्हास केल्याचे कांदळवन उपसमितीच्या अहवालात आढळले आहे.

या जागेत मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवन ५० मीटर अंतराच्या आत कोणतेही बांधकाम करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. संबंधित बांधकामाचे विकासक, तसेच इतर संबंधितांनी त्या जागेत डेब्रिज मातीची भरणी व बांधकाम केले असल्याचे तक्रारदार वरिष्ठ पर्यावरण कार्यकर्ते धीरज परब यांच्यासह संबंधित वनविभाग व महसूल विभागाने पाहणी केली असता दिसून आले.

यावरून अपर तहसीलदार निलेश गौंड यांच्या आदेशाने तलाठी वंदना आव्हाड यांच्या तक्रारीवरून काशीमीरा पोलीस ठाण्यात पर्यावरण संरक्षण अधिनियमाच्या विविध कलमांतर्गत काशीमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास काशीमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर पाटील हे करत आहेत.

# खुल्या रंगमंचाच्या उद्घाटनासाठी तब्बल १० वर्षे

## दिरंगाई प्रकरणी दोषींवर कारवाईची राष्ट्रवादीकडून मागणी



**वसई :** कोट्यवधींचा खर्च करून तब्बल १० वर्षांनी तयार झालेल्या नालासोपाऱ्यातील खुल्या रंगमंच प्रकरणी दिरंगाईस कारणीभूत ठरलेल्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे.

दहा वर्षांपूर्वी नालासोपारा-लक्ष्मीबेन छेडा मार्गावर महापालिकेने खुल्या रंगमंचाच्या कामाला सुरुवात केली. नंतर रंगमंचाचे घोंगडे भिजत पडले होते. विधानसभा निवडणूक तोंडावर आल्यावर सत्ताधारी बहुजन विकास आघाडीने रंगमंचाचे रविवारी घाईत उद्घाटन केले. त्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे वसई विरार जिल्हाध्यक्ष मनोज म्हात्रे यांनी आक्षेप घेतला आहे.

२०१४ मध्ये रंगमंचाचा प्रस्ताव तयार झाला होता. २०१५ मध्ये कार्यादेशही काढण्यात आला होता. मंचाच्या सहा वेगवेगळ्या कामांसाठी ठेकेदारांना काम देण्यात आले होते. कामातील दिरंगाईमुळे अनेकदा बजेट वाढवले गेले आणि कोट्यवधी रुपये खर्च केल्यानंतर १० वर्षांनी त्याचे उद्घाटन करण्यात आले.

**रेल्वे उड्डाणपुलासाठी पालिकेला रेल्वेकडून परवानगी घेऊन एमएमआरडीएला द्यावी लागणार आहे. मात्र समन्वयाअभावी हे कामही रखडले आहे. कोस्टल रोड आणि रिंग रुटची चर्चा फक्त निवडणूक जाहीरनाम्यापुरती केली जाते. वसईत आयटी हब (बीकेसीच्या धर्तीवर) बनणार होते. त्यातून हजारो तरुणांना रोजगार मिळाला असता, मात्र तेही कागदावरच राहिले आहे.**

या कार्यक्रमाला पालिकेने कोणताही प्रोटोकॉल पाळला नाही. कोणतेही निमंत्रणपत्र तयार करण्यात आले नाही. विरोधी पक्ष, पत्रकार, रंगकर्मी यापैकी कोणालाही निमंत्रण दिले गेले नाही. एक रंगमंच तयार होण्यासाठी १० वर्षे लागत असतील तर विकासकामांचे काय, असा प्रश्न राष्ट्रवादीचे प्रसिद्धी प्रमुख कमर बेग यांनी उपस्थित केला आहे. मूलभूत सुविधांसाठी नागरिक संघर्ष करीत आहेत. बोळिंज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे काम गेली सात वर्षे रखडले आहे. रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. असे मुद्दे उपस्थित करून राष्ट्रवादी पक्षाचे मनोज म्हात्रे, विनायक खरडे, चंद्रकांत कदम, श्रीधर पाटील यांनी खुल्या रंगमंचाला झालेल्या दिरंगाई प्रकरणी चौकशी करून ठेकेदार, अभियंत्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु.पा. ७

# मिरा-भाईंदरमध्ये नवीन ६८ हजार मतदार

**भाईंदर :** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर मिरा-भाईंदर शहरात ६८ हजार नव्या मतदारांची भर पडली आहे. यामुळे एकूण मतदार संख्या पाच लाख सात हजार ५४२वर पोहचली आहे.

मिरा-भाईंदर १४५ विधानसभा मतदारसंघात अखेरच्या दिवसापर्यंत मतदारांची संख्या ही पाच लाख सात हजार ५४२ असल्याचे ठाणे जिल्हा अधिकाऱ्यांकडून जाहीर करण्यात आली आहे. यात पुरुष मतदारांची संख्या दोन लाख ६६ हजार २३५ आणि महिला मतदारांची संख्या दोन लाख ४१ हजार २१३ आहे. लोकसभा निवडणुकीत मिरा-भाईंदर मतदारसंघात चार लाख ३९ हजार २८३ मतदार होते. २०१९मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघातील मतदारांची संख्या चार लाख ३६ हजार ४२६ होती.

विधानसभा निवडणुकीसाठी मिरा-भाईंदर मतदारसंघात सुमारे ४८९ मतदान केंद्रे असणार आहेत. त्यासाठी ४८९ मतदान यंत्रे व तेवढीच मतदान यंत्रे राखीव ठेवण्यात आली आहेत. व्हीव्हीपॅट यंत्रांची संख्या ६३६ असणार आहे. मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सुनील भुताळे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे कार्यालय भाईंदर पश्चिम येथील अतिरिक्त तहसीलदार कार्यालयाच्या इमारतीत तळमजल्यावर असणार आहे. निवडणुकीची मतमोजणी भाईंदर पूर्व येथील प्रमोद महाजन सभागृहात पार पडणार आहे.

लोकसत्ता पु.पा. ४

# भोंदू मांत्रिकांकडून तरुणीला लाखोंचा गंडा

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** घरची आर्थिक स्थिती ठिक करण्यासाठी मांत्रिकाचा आधार घेणाऱ्या एका तरुणीला दीड लाख रुपयांचा गंडा घालण्यात आल्याची बाब उघड झाली आहे. याप्रकरणी नयानगर पोलिसांनी तीन जणांविरोधात महाराष्ट्र नरबळी आणि जादूटोणा अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

वैष्णवी पटेल (२०) ही तरुणी सांताक्रुझ येथे राहते. तिच्या घरची आर्थिक परिस्थिती खालावली होती. तिने सप्टेंबर महिन्यात वर्तमानपत्रात एक जाहिरात पाहिली होती. मिरा रोड येथील मुस्ताक शाह नावाच्या मांत्रिकाने जादूटोणा करून आर्थिक परिस्थिती सुधारेल असा दावा केला होता. त्यानुसार या तरुणाने मांत्रिकाला संपर्क केला. मांत्रिकाने दोनवेळा पूजा विधी करण्याच्या नावाखाली एक लाख सात हजार आणि नंतर ३२ हजार असे पैसे घेतले होते. पीडित तरूणीने गुगल पेद्वारे आणि रोख स्वरूपात ही रक्कम दिली होती. २१ ते २८ सप्टेंबर या काळात हा पूजा विधी करण्यात आला. मात्र तक्रारदार तरूणीच्या आर्थिक परिस्थितीत काही बदल झाला नाही. मात्र या मांत्रिकाने रेड्याचा बळी द्यावा लागेल असे सांगून आणखी पैशांची मागणी केली. ती पूर्ण न केल्यास घरातील जवळच्या व्यक्तीचा मृत्यू होईल, अशी भीती घातली.

एकंदरीत या सर्व प्रकार पाहता आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार तरुणीने नयानगर पोलीस ठाणे गाठले. आम्ही या प्रकरणी मुश्ताक शाह, जावे आणि रिजाझ चौधरी आदी तीन भोंदू मांत्रिकांविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती नयानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली.

## ढोंगी बाबांकडून बलात्काराच्या घटना

**९ मे २०२४ :** जादूटोणाच्या नावाखाली एका महिलेवर बलात्कार करुन तिची अश्लील छायाचित्रे काढणाऱ्या विनोद पंडित नावाच्या ढोंगी बाबाला नया नगर पोलिसांनी अटक केली आहे. हस्तरेखातज्ज्ञ असल्याचा दावा करणाऱ्या हा ढोगा बाबा फेसबुकवर जाहिरात करून तो महिलांना आपल्या जाळ्यामध्ये ओढत असे. त्याने अनेक महिलांना अशाप्रकारे फसवले असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

**२५ जुले २०२३ :** भाईंदरमध्ये मुकेश दर्जी नावाचा एक मांत्रिक एका महिलेवर विविध उपचारांच्या नावाखाली दोन वर्ष बलात्कार करत होता. त्याला भाईंदर पोलिसांनी अटक केली होती.

लोकसत्ता पू.पा. ७.

# ४१ इमारतींवर पुढील आठवड्यात कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा येथील पालिकेच्या आरक्षित भूखंडावर बांधण्यात आलेल्या ४१ अनधिकृत इमारतींवर पुढील आठवड्यापासून कारवाई केली जाणार आहे. पालिकेने पोलिसांकडे पोलीस बंदोबस्तासाठी मागितलेली परवानगी मिळाल्याने कारवाईतील अडथळा दूर झाला आहे.

नालासोपारा पूर्वेच्या विजयनगर, लक्ष्मीनगर येथील भूमापन क्रमांक २२ ते ३४ आणि ८३ येथे महापालिकेच्या मलःनिसारण प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) आणि कचराभूमीसाठी (डंपिंग ग्राऊंड) आरक्षित असलेल्या जागेवर ४१ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. त्यात तीन हजारांहून अधिक रहिवाशी आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेला कारवाईचे निर्देश दिले होते. याविरोधात रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. राखीव आणि खासगी जागा बळकावून इमारती बनविलेल्या असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे पालिकेने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. इमारतींचा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी महावितरणाला पत्र देण्यात आले आहे. याशिवाय पोलीस बंदोबस्तासाठी दोन वेळा पत्र देऊनही पोलिसांकडून बंदोबस्त मिळत नसल्याने कारवाईसाठी अडथळा निर्माण झाला होता. अखेर पोलीस आणि सामाजिक संघटनांची बैठक पार पडली आणि कारवाईसाठी संमती देण्यात आली.

पहिल्या टप्प्यात अतिधोकादायक असलेल्या (सी-१ वर्ग) सात इमारतींवर कारवाई होणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इमारती जमीनदोस्त केल्या जातील, असे प्रभाग समिती ड चे सहाय्यक आयुक्त मोहन संख्ये यांनी सांगितले. काही तांत्रिक बाबी पूर्ण करायच्या असल्याने लगेच पोलीस संरक्षण देता आले नव्हते. मात्र आता पोलीस संरक्षण देत आहोत, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.क्र.३.

# पत्नी की हत्या कर शव फ्रिज में रखा

## फर्जी डेथ सर्टिफिकेट बनवाने के चक्कर में घूम रहा था

## पुलिस ने मुखबिर की सूचना पर पति को कर लिया गिरफ्तार

## घर में एक आदमी को देखते ही आरोपी हो गया था आगबबूला

भास्कर संवाददाता | वसई

पत्नी के चरित्र पर संदेह कर उसकी ओढ़नी से गला दबाकर हत्या करने वाले पति को पेल्हार पुलिस ने गिरफ्तार किया है। दरअसल पुलिस ने आरोपी को उस समय गिरफ्तार किया, जब वह शहर के डॉक्टरों से फर्जी डेथ सर्टिफिकेट बनवाने की जुगाड़ में लगा था। हत्या की वारदात को अंजाम देने के बाद आरोपी ने पत्नी के शव को एक बड़े फ्रिज में करीब 12 घंटे से ज्यादा समय तक बंद रखा था। आरोपी पति की पहचान इस्माइल अब्दुल कयूम चौधरी के रूप में हुई है, जबकि मृतक महिला का नाम खुर्शीदा खातून इस्माइल चौधरी बताया गया है।

पुलिस के मुताबिक, खुर्शीदा और इस्माइल कामण क्षेत्र स्थित भजन लाल डेयरी के पीछे रहते थे। जून महीने में दोनों का विवाह हुआ था। आरोपी इस्माइल नजदीक की एक कंपनी में काम करता है। इस्माइल बुधवार को दोपहर दो बजे घर पर अचानक खाना खाने आया था। वह घर की कुंडी काफी देर तक खटखटाता रहा, लेकिन घर का दरवाजा नहीं खुला। दूर देर कुंडी बजाने के बाद उसकी पत्नी ने दरवाजा खोला, तभी घर से एक व्यक्ति भागता हुआ दिया। आरोपी ने पत्नी से उस व्यक्ति के बारे में पूछा लेकिन, उसकी पत्नी उसे गुमराह करने लगी। इस दौरान बाद-विवाद हो गया। गुस्से में आरोपी पति ने ओढ़नी से गला दबाकर पत्नी की हत्या कर दी।








### मुखबिरों से मिल गई पुलिस को सूचना

पुलिस ने बताया कि आरोपी हत्या करने के बाद शव को दफनाना चाहता था, लेकिन इसके लिए डेथ सर्टिफिकेट की जरूर थी। उसने कुछ पहचान के डॉक्टरों के पास फर्जी डेथ सर्टिफिकेट बनाने की मिन्नत की, लेकिन सभी ने फर्जी डेथ सर्टिफिकेट देने से इनकार कर दिया। इसके बाद उसने वसई (पूर्व) नवजीवन इलाके में रहनेवाले भाई से संपर्क किया और घटना की जानकारी दी। इस दौरान शौहर ने मृतक के शव को एक बड़े फ्रिज में बंद कर दिया और फर्जी डेथ सर्टिफिकेट बनाने वाले डॉक्टरों की तलाश करने लगा गया। हालांकि इस दौरान मुखबिरों से पेल्हार पुलिस की डिटेक्शन ब्रांच को फर्जी डेथ सर्टिफिकेट मांगने की जानकारी मिल चुकी थी। इसके बाद पुलिस ने आरोपी को संदेह के आधार पर हिरासत में लिया।

### साले को किया गुमराह

पुलिस ने बताया कि आरोपी का साला पुणे में रहता है। आरोपी ने उसे गुमराह किया। इस्माइल ने साले को बताया कि खुर्शीदा के पेट में बहुत जोरों से दर्द हो रहा था, जिससे उसकी मौत हो गई। इसके बाद भाई ने कहा कि उसे आने में सुबह हो जाएगी। इस मामले में पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी ने बताया कि घटना नायगांव पुलिस स्टेशन अंतर्गत हुई है। हमने आरोपी को गिरफ्तार किया और नायगांव पुलिस के हवाले कर दिया है। फिलहाल इस मामले की जांच नायगांव पुलिस कर रही है।

# बताए पांच लाख रुपए और दे दिए कागज के बंडल, चार गिरफ्तार

- नालासोपारा में दिया था वारदात को अंजाम
- सभी आरोपी बोईसर के रहने वाले बताए गए

भास्कर संवाददाता | विरार

वसई-विरार में एक बुजुर्ग को आभूषण के बदले कागज का बंडल देने वाले चार आरोपियों को क्राइम ब्रांच ने गिरफ्तार किया है। पुलिस ने दो मामलों का खुलासा करते हुए इनके पास से तीन लाख रुपए के सोने के आभूषण बरामद किए हैं। आरोपियों की पहचान शंकर राय, मंगल सिलावट, सचिन राठौड, राजूराय शंकर राय के रूप में हुई है। सभी आरोपी बोईसर के निवासी है।

पुलिस ने बताया कि 12 अक्टूबर शाम सवा चार बजे नालासोपारा (पूर्व) केएमपीडी कॉलेज के पास शिकायतकर्ता 59 वर्षीय बुजुर्ग महिला से जालसाजी की वारदात को अंजाम दिया गया था। आरोपी पांच लाख रुपए के नाम पर कागज के बंडल देकर एक लाख रुपए के आभूषण लेकर फरार हो गए थे। इसकी शिकायत पीड़िता ने तुलिंज पुलिस स्टेशन में दर्ज कराई थी। शिकायत के बाद पुलिस और क्राइम ब्रांच की टीम जांच में जुट गई और मुखबिरों को अलर्ट किया। पुलिस को शहर में लगाए गए सीसीटीवी कैमरे की जांच में आरोपी की पहचान मिल गई। मुखबिरों की सूचना के आधार पर क्राइम ब्रांच ने चारों आरोपियों को गिरफ्तार कर लिया। पुलिस की पूछताछ में आरोपियों ने गुनाह कबूल करते हुए विरार में एक वारदात को अंजाम देने की जानकारी दी।



# काशीमीरा: अंधेरे में छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा

- विधायक गीता जैन ने जताई नाराजगी

भास्कर न्यूज | भायंदर



अनावरण के समय का दृश्य

छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा अंधेरे में रहने की लिखित शिकायत विधायक गीता जैन ने मीरा-भायंदर मनपा प्रशासन से की है। इस बात को लेकर उन्होंने नाराजगी भी जताई है। विधायक ने बताया कि काशीमीरा के सांगनाई देवी मंदिर के पास छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा के पास प्रकाश की पर्याप्त और उचित व्यवस्था अभी तक की ही नहीं गई है। 23 अक्टूबर को प्रतिमा का अनावरण किया गया था। वहां पर सौंदरीकरण का काम भी नहीं हुआ है। अंधेरा रहने से रात में प्रतिमा नजर नहीं आती है। इससे जनभावना आहत हो रही है। उन्होंने मीरा मीरा-भायंदर मनपा आयुक्त को पत्र लिखकर तत्काल प्रकाश की व्यवस्था करने की मांग की है। मनपा के शहर अभियंता दीपक खांबित ने बताया कि लाइट खराब होने से अंधेरे की शिकायत आई है। मौके पर हाई मास्ट लाइट लगाने की प्रक्रिया शुरू कर दी गई है।

Scanned with OKEN Scanner